नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०३/२०२५ (शनिवार) संध्याकाळ

---

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या ४ आरोपीतांना अटक
## २ गुन्हे नोंद, २६ जनावरांची सुटका ,मौदा पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक २१/०३/२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की भंडारा कडुन नागपुर कडे बोलोरो पिकअप गाडयांमध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी रबडीवाला फाटा मौदा,शिवार , रोडवर नाकाबंदी करून खालील प्रमाणे दोन गुन्हे नोंद केले आहे.

१. **नाकाबंदी दरम्यान** बोलोरो पिकअप एम. एच. ३५ ए.जे. २७७७ हे वाहन **मिळुन आले. वाहन** थांबवुन **वाहनाची** तपासणी केली असता त्यामध्ये १२ गोवंश जानावरे बाधुंन निर्दयते कोंबुन ,चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले . वाहन चालक **आदित्य उत्तम कांबळे, वय २५ वर्षे, रा. घोटी, गोरेगाव, जि. गोंदीया** आणि क्लिनर **प्रतिक कार्तीक मेश्राम,वय २१ वर्षे,रा घोटी,ता गोरेगाव जि गोंदीया हे** मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक बोलोरो पिकअप एम.एच. ३५ ए.जे. २७७७ किंमती ५,००,०००/— रूपये. **व १२ गोवंश जानावरे १,२०,०००** /— रूपये एकुण किंमती **६,२०,०००**/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

२. **नाकाबंदी दरम्यान पोलीसांना** बोलोरो पिकअप एम एच ३५ एजे २९४३ हे वाहन **मिळुन आले. वाहन** थांबवुन **वाहनाची** तपासणी केली असता त्यामध्ये १४ गोवंश जानावरे बाधुंन निर्दयते कोंबुन, चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले .**वाहन चालक सम्राट कांतीलाल येवले,वय ३२ वर्षे, रा इंदीरा नगर** गोरेगाव जि गोंदीया आणि क्लिनर आरोपी नामे **संदीप मनोहर राउत, वय ३२ वर्षे, रा डवकी ता देवरी जि गोंदीया** हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक

बोलोरो पिकअप एम. एच. ३५ ए.जे. २९४३ किंमती ५,००,०००/— रूपये. **व १४ गोवंश जानावरे** १,४०,००० /— रूपये **एकुण किंमती ६,४०,०००/—** रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. दोन्ही कारवाई मध्ये एकुण **२६ जनावरे आणि दोन वाहनासह १२,६०,०००/— रूपयांचा** मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद चारही आरोपी पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ११(१), ११(१)(डी), ११(१) (इ) ११ (१) (एफ) प्रा.छ.प्र.अधि १९६० सहकलम ५ए (१), ९ महा. पशु सं.अधि १९७६ अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**चारही आरोपीतांना मौदा पोलीसांनी अटक केली आहे**.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर